
# दुःखद निधन



## कै. श्री. शशिकांत शामराव नाईक (शशीदादा)

**(जन्म : दि. ५ ऑक्टोबर १९३३ – मृत्यू : दि. ५ नोव्हेंबर २०२०)**

आपल्या सर्वांचे आदरणीय श्री. शशिकांत शामराव नाईक ह्यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी दु:खद निधन झाले. कै. शशिकांत शामराव नाईक ह्यांनी अनेक सामाजिक व धार्मिक संस्थेत गेली ५० वर्षांहून अधिक वर्षे निस्वार्थीपणे व प्रामाणिकपणे सेवा केली. त्यांनी सेवा केलेल्या संस्थामध्ये प्रामुख्याने

१) श्री सिद्धिविनायक देवस्थान, अंजूर

२) क्षात्रैक्य समाज, दादर

३) आयसीआय पेन्शनर्स असोसिएशन

४) रामकृष्ण मिशन, दादर

इतर सामाजिक संस्था

सामाजिक कार्यात त्यांनी सर्वांशी मिळून मिसळून, मैत्रीपूर्ण काम केले व सर्वांशी जुळवून घेतले, सर्वांना सर्वतोपरी मदत केली. त्यांच्या पश्चात संदीप शशिकांत नाईक व मेजर मनिष शशिकांत नाईक हे दोन पुत्र आहेत.

कै. श्री. शशिकांत नाईक ह्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

न जायते म्रियते वा कदाचि-, न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो, न हन्यते हन्यमाने शरीरे ।।

तात्पर्य : कोणत्याही काळी आत्म्यासाठी जन्मही नाही आणि मृत्युही नाही. त्याचा जन्म झाला होता असेही नाही, त्याचा जन्म होतो असेही नाही आणि त्याचा जन्म होणार आहे असेही नाही. तो अजन्मा, सनातन, नित्य अस्तित्वात असणारा आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाला तरी त्याचा नाश होत नाही.